आर सी एफ
समृध्दीची एकत्र वाटचाल

# आर सी एफ शेती पत्रिका

कृषी समृद्धीची मार्गदर्शिका

आज़ादी का अमृत महोत्सव

वर्ष १४ अंक – १ मुंबई जुलै २०२२ पाने – २४ किंमत ₹ ५/–





# संचालक (विपणन) यांचे मनोगत

आपण सोयी सुविधायुक्त जीवन जगावे असे प्रत्येकालाच वाटत असते. परिणामी आजही देशाच्या ग्रामीण भागातून लोक शहराकडे स्थलांतरित होताना दिसत आहेत. त्यामुळे शहरीभागांची वाढ होत आहे. आपण देश कृषीप्रधान आहे असं म्हणत असलो तरी ग्रामीण शेती केंद्रित उदरनिर्वाहाच्या व्यवस्थेमधील अनास्था प्रकर्षाने जाणवत असते. आधुनिक कृषीतंत्रज्ञानाकडे म्हणावे तेवढे लक्ष न दिल्याने उत्पादन कमी आणि खेड्यातील स्थलांतरामुळे मजूर टंचाई अशा दुहेरी पेचप्रसंगातून आज शेतकरीवर्गाची वाटचाल सुरू आहे. वर्ष २०५० पर्यंत शहरी लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. याचा परिणाम भाजीपाला, अन्नधान्य, फळे आणि इतर कृषीसंबंधित उत्पादनांवर होईल. केवळ खाद्यतेलाच्या बाबतीत बोलायचे झाले तर १३८ कोटीहून अधिक लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात दरवर्षी २५० लाख मे. टन खाद्यतेलाचा वापर केला जातो आणि आपले उत्पादन आहे फक्त १०५ लाख मे. टन ! बाकी १४५ लाख मेट्रिक टन खाद्य तेलाची आयात केली जाते ! यासाठी दरवर्षी ६८ हजार कोटी रुपयाहून अधिक किंमतीचे परकीय चलन खर्च होत असते. इंधन तेलावरील आपले अवलंबित्व तर जग जाहीर आहे, पण भविष्यकालात देश सक्षम करण्याच्या दृष्टीने देशाचा आधारस्तंभ असलेला शेतकरीवर्ग खाद्यतेल उत्पादकतेमध्ये देशाला आत्मनिर्भर नक्कीच बनवू शकेल.

आता देशात मुख्यत्वे करून कृषीक्षेत्रात सुधारणा होताना दिसत आहेत. कृषी निविष्ठा निर्मिती मध्ये आपणाला स्वयंपूर्ण बनावे लागेलच त्याचबरोबर कृषीमाल नासाडी थांबवून अन्नप्रक्रिया उद्योगांमध्ये प्राविण्य मिळवावे लागेल. खेड्यातील जनतेला रोजगाराची संधी उपलब्ध करून दिल्यास शहराकडे धावणाऱ्या युवकांची शहरी ओढ कमी होऊन निश्चितपणे या युवाशक्तीचा उपयोग देशाच्या कृषी प्रगतीसाठी होईल.

महाराष्ट्र कृषी दिन आणि आषाढी एकादशी निमित्त आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा.

धन्यवाद.

(के.यू. थंकाचन)
संचालक (विपणन)

## अंतरंग


| | |
|---|---|
| ३-६ | सूक्ष्म अन्नद्रव्य आणि त्यांचा पिकासाठी होणारा उपयोग |
| ७-९ | पूर्व तयारी फळबाग लागवडीची |
| १० | कोरडवाहू तेलबिया पिकांसाठी एकात्मिक अन्नद्रव्यांचे व्यवस्थापन |
| ११ | सुगंधी - सुगंधी आणि औषधी वनस्पती |
| १२-१३ | पर्यावरणाचे करा रक्षण, उज्वल भविष्याचे हेच धोरण |
| १४-१५ | बियाणे खरेदी करताना दक्षता हवीच.. |
| २३ | जपणूक आमची, सामाजिक बांधिलकीची.... |


आर सी एफ
समृध्दीची एकत्र वाटचाल

संपादक : नुहू हसन कुरणे
Editor : Nuhu Hasan Kurane

संपादकीय समन्वयन - मिलिंद आंगणे
Editorial Co-ordination - Milind Angane
(022-25523022)
Email ID : crmrcf@gmail.com

• सल्लागार समिती • • Advisory Committee •
श्री. नरेंद्र कुमार Mr. Narendra Kumar
श्री. गणेश वरगंटीवार Mr. Ganesh Wargantiwar
श्री. माल्कम क्रियाडो Mr. Malcolm Creado
सौ. निकीता पाठारे Mrs. Nikita Pathare
श्री. लिलाधर महाजन Mr. Liladhar Mahajan

शेती पत्रिका आता पुढील संकेत स्थळावर उपलब्ध.
www.rcfltd.com

# सूक्ष्म अन्नद्रव्य आणि त्यांचा पिकासाठी होणारा उपयोग

डॉ. मनिषा पालवे, प्रा.वैभव बोंद्रे
शासकीय कृषी व्यवस्थापन महाविद्यालय, मालेगाव जिल्हा नाशिक (महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत) मो. ८७७९९४४३६७

पिकाच्या परिपूर्ण वाढीसाठी कमी प्रमाणात लागणाऱ्या अन्नद्रव्यांना 'सूक्ष्म अन्नद्रव्ये' असे म्हटले जाते. या अन्नद्रव्यांचे कार्य पीक वाढीमध्ये आणि अधिक उत्पादनाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. या अन्नद्रव्यांची कमतरता कशी ओळखावी याबद्दल शेतकऱ्यांना माहिती असणे गरजेचे असते.

## मोलाब्द (मॉलिब्डेनम)

**मॉलिब्डेनमचे (Molybdenum) पिकातील कार्य -**

- मॉलिब्डेनम पिकामध्ये नायट्रेटचे रूपांतर अमिनो ॲसिडमध्ये होण्यात कार्य करते.
- हा घटक सहजीवी नत्र स्थिरीकरणामध्ये गरजेचा आहे.

**मॉलिब्डेनमच्या उपलब्धतेवर परिणाम करणारे घटक -**

- जमिनीचा सामू - मॉलिब्डेनम हे एकमेव सूक्ष्म अन्नद्रव्य आहे जे जास्त सामू असलेल्या मातीत सहज उपलब्ध होते.
- जास्त प्रमाणात पाणी वाहून जाणाऱ्या जमिनीत मॉलिब्डेनमची कमतरता जाणवते.

**मॉलिब्डेनमचा विविध स्त्रोत आणि त्यांचे प्रमाण-**

१) सोडीयम मॉलिब्डेट- ३९%
२) मॉलिब्डेनम ट्रायऑक्साईड - ६६%
३) अमोनियम मॉलिब्डेट - ५४%

Follow : rcfkisanmanch on
facebook twitter instagram

## लोह (फेरस)

### लोह अन्नघटकाचे पिकातील कार्य –

- हरितलवक निर्मितीत आणि हरीतलवकाच्या कार्यात लोह गरजेचे असते.
- पिकांतर्गत उर्जेच्या वहनासाठी गरजेचे आहे.
- हे अन्नद्रव्य काही एन्झाईम्स व प्रोटीन्सचा घटक आहे.
- पिकांतर्गत अन्ननिर्मितीसाठी आणि चयापचयाच्या क्रियेत लोह गरजेचे असते.
- सहजीवी नत्र स्थिरीकरणाच्या क्रियेत याचा सहभाग असतो.

### लोह (फेरस) उपलब्धतेवर परिणाम करणारे घटक–

- **जमिनीचा सामू–** जास्त सामू असलेल्या जमिनीतील कार्बोनेट्समुळे देखील लोहाची उपलब्धता कमी होते.
- लोह आणि स्फुरद संबंध – जास्त प्रमाणातील स्फुरदामुळे लोहाची उपलब्धता कमी होते.
- नायट्रेट नत्राच्या वापरामुळे पिकातील धन-ऋण भार असंतुलन निर्माण होऊन लोहाची कमतरता निर्माण होते.
- लोह आणि मँगनिज संबंध – दोन्ही मुलद्रव्य विरोधात असल्याने एकाची जास्त उपलब्धता दुसऱ्याची उपलब्धता कमी करते.
- लोह आणि मॉलिब्डेनम– जास्त प्रमाणातील मॉलिब्डेनम मुळे पिकाच्या मुळांवर आयर्न मॉलिब्डेटचा थर तयार होतो.

### लोह (फेरस) चे विविध स्त्रोत व प्रमाण –

१) फेरस सल्फेट – २०%
२) फेरस अमोनियम सल्फेट– १४%
३) आयर्न डीटीपीए चिलेट – १०%
४) आयर्न एचईडीटीए चिलेट – ५ ते १२%

## मंगल (मँगनिज)–

### मँगनिजचे पिकातील कार्य –

- प्रकाश संश्लेषण क्रियेत कार्बन डाय ऑक्साईडचे रुपांतर शर्करेमध्ये होण्यात कार्य करते.
- हा अन्नघटक हरितलवक निर्मितीत आणि नायट्रेट ॲसिमिलेशन मध्ये कार्य करतो.
- मँगनिज स्निग्ध पदार्थ तयार करण्याच्या प्रक्रियेत गरजेच्या एन्झाईम्सच्या ॲक्टिवेशनसाठी गरजेचे असते.
- रिबोफ्लॅविन, ॲस्कोर्बीक ॲसिड आणि कॅरोटीन तयार करण्यासाठी हे अन्नद्रव्य गरजेचे आहे.
- प्रकाश संश्लेषण क्रियेत इलेक्ट्रॉनची देवाणघेवाण करण्यात तसेच पाण्याचे विघटन करण्यात याचा सहभाग असतो.

### मँगनिज उपलब्धतेवर परिणाम करणारे घटक–

- **जमिनीचा सामू–** मातीचा सामू जास्त असल्यास मँगनिजची उपलब्धता कमी होते, तर कमी सामूमध्ये उपलब्धता वाढते.
- **सेंद्रीय पदार्थ –** जास्त प्रमाणात सेंद्रीय पदार्थ असलेल्या जमिनीत मँगनिज त्या पदार्थांसोबत स्थिर होते व त्याची कमतरता जाणवते.
- **मँगनिज आणि लोह संबंध –** जास्त प्रमाणातील लोह मँगनिजची उपलब्धता कमी करते.
- **मँगनिज आणि सिलीकॉन संबंध –** सिलिकॉनच्या वापराने मँगनिजची विषबाधा कमी करता येते.
- नत्राच्या कमतरतेमुळे मँगनिजची उपलब्धता कमी होते.

### मँगनिजचे विविध स्त्रोत व त्यातील प्रमाण –

१) मँगनिज सल्फेट – २३ ते २८%
२) मँगनिज ऑक्साईड– ४१ ते ६८%
३) चिलेटेड मँगनिज– ५ ते १२ %

## बोरॉन

### बोरॉन अन्नघटकाचे पिकातील कार्य –

- बोरॉन पिकामध्ये शर्करा आणि स्टार्च यात संतुलन साधते.
- हा घटक पिकातील शर्करेच्या आणि कर्बोदकांच्या वहनात गरजेचा आहे.
- परागीभवन आणि बीज निर्मितीत आवश्यक आहे.

- हे अन्नद्रव्य नियमित पेशी विभाजन, नत्राच्या आणि प्रथिनांच्या चयापचयात आवश्यक आहे.
- नियमित पेशीभित्तीका तयार होण्यात गरजेचे आहे.
- पिकांतर्गत जल व्यवस्थापनात महत्वाचा सहभाग असतो.

**बोरॉनच्या कमतरतेवर परिणाम करणारे घटक –**

- **जमिनीचा सामू–** जास्त सामूमुळे बोरॉनची कमतरता निर्माण होते.
- जास्त प्रमाणात जमिनीत पाणी झाल्यास बोरॉन वाहून जाते व त्याची कमतरता जाणवते.

**बोरॉनचे विविध स्त्रोत व त्याचे प्रमाण –**

१) बोरॅक्स – ११%
२) बोरीक ॲसिड– १७%
३) सोडीयम टेट्राबोरेट १० ते २०%
४) सोल्युबोर– २०%

## तांबे (कॉपर)

**तांबे अन्नघटकाचे (कॉपर) पिकातील कार्य –**

- तांबे (कॉपर) पिकामधील प्रकाश संश्लेषण क्रियेत आणि श्वसनाच्या क्रियेत उत्तेजक म्हणून कार्य करते.
- अमिनो ॲसिडचे रूपांतर प्रोटीन्समध्ये करणाऱ्या काही एन्झाईम्सचा हा घटक आहे.
- हा घटक कर्बोदके आणि प्रथिनांच्या पचनात गरजेचा आहे.
- पिकाच्या पेशीला ताकद आणि सुरक्षा प्रदान करणाऱ्या लिग्निनच्या निर्मितीसाठी तांबे अत्यंत गरजेचे आहे.
- हे अन्नद्रव्य पिकांच्या टिकाऊ क्षमतेवर, चव आणि शर्करेच्या प्रमाणांवर देखील नियंत्रण करते.
- पिकांवर तांबे युक्त बुरशीनाशकांची सतत फवारणी होत असते त्यामुळे देखील याची गरज पूर्ण होत असते.

**तांबे घटकाचे (कॉपर) विविध स्त्रोत आणि त्यातील प्रमाण –**

१) कॉपर सल्फेट मोनोहायड्रेट– ३५%
२) कॉपर सल्फेट – २५%
३) क्युप्रिक ऑक्साईड– ७५%
४) कॉपर क्लोराईड– १७%
५) कॉपर चिलेटस– ८ ते १३%

## जस्त (झिंक)–

**जस्ताचे (झिंक) पिकामधील कार्य –**

- ऑक्झिन्सच्या निर्मितीमध्ये गरजेचे अन्नद्रव्य असून प्रामुख्याने इंडॉल ॲसेटिक ॲसिडच्या निर्मितीत सहकार्य करते. ज्यामुळे पिकाच्या शेंड्याची वाढ जोमदार होण्यात मदत मिळते.
- प्रथिनांच्या निर्मितीसाठी गरजेच्या एन्झाईम्सची निर्मिती करते तसेच पिकामधील शर्करेच्या वापरासाठी गरजेचे आहे.
- जस्त हा घटक पिकामध्ये स्टार्च तयार करणे आणि मुळांच्या वाढीसाठी गरजेचा असतो.
- जस्त बीज आणि खोडाच्या पक्वतेवर परिणाम कारक असते.
- हरितलवक आणि कर्बोदकांच्या निर्मितीत आवश्यक असते.
- पिकाच्या पेशींमधील योग्य प्रमाणातील जस्ताच्या उपस्थितीमुळे, पीक कमी तापमानात देखील तग धरुन राहते.

**जस्ताच्या उपलब्धतेवर परिणाम करणारे घटक –**

- **जमिनीचा सामू–** मातीचा सामू जास्त असल्यास जस्ताची कमतरता जाणवते. मात्र हा नियम सर्वच ठिकाणी लागु होत नाही. अतिरिक्त ॲसिडीक स्वरूपातील जस्ताचा वापर करुन ही कमतरता भरून काढता येते.
- **जस्त आणि स्फुरदचे गुणोत्तर–** अधिक प्रमाणातील स्फुरदमुळे जस्ताची कमतरता जाणवते.
- नत्राची कमी प्रमाणातील उपलब्धता, पिकाच्या

वाढीवर करीत असलेल्या दुष्परिणामांमुळे इतर अन्नद्रव्यांचे शोषण कमी होते. हाच परिणाम जस्त घटकालाही देखील लागु पडतो.

- **सेंद्रीय पदार्थ –** जमिनीतील सेंद्रीय पदार्थ जस्ताचा पुरवठा करीत असतात. सेंद्रीय पदार्थांमुळे रासायनिक ऑरगॅनिक स्वरूपातील जस्ताचे चिलेशन होऊन त्याची पिकासाठीची उपलब्धता वाढते.
- जमिनीतील अधिक प्रमाणातील पाण्यामुळे जस्ताची उपलब्धता कमी होते.
- **जस्त व तांबे यांचे गुणोत्तर–** जस्त (झिंक) व तांबे (कॉपर) पीक एकाच पध्दतीने शोषून घेत असल्याकारणाने, जर एकाचे प्रमाण वाढले तर दुसऱ्याची कमतरता जाणवते.
- **जस्त (झिंक) व मग्न (मॅग्नेशियम) गुणोत्तर–** मॅग्नेशियमच्या वापराने जस्ताचे पिकांद्वारा शोषण वाढते.

**जस्ताचे विविध स्त्रोत व त्यातील सर्वसाधारण प्रमाण:**

१) झिंक सल्फेट– ३६%
२) झिंक ऑक्झिसल्फेट– ३८ ते ५०%
३) झिंक ऑक्साईड– ५० ते ८०%
४) झिंक क्लोराईड– ५०%
५) झिंक चिलेट– ६ ते १४%

## निर्गुडी वनस्पतीचे औषधी उपयोग

- **या वनस्पतीच्या पानांचा काढा सांधेदुखी, सूज कमी करतो,**
- **सांधेदुखीमध्ये निर्गुडीची पाने गरम करून दुखऱ्या सांध्यावर लावावीत तसेच पाने पाण्यात उकळवून त्याची वाफ सांधेदुखीच्या भागावर घ्यावी त्यामुळे वेदना कमी होतात.**
- **या वनस्पतीच्या तेलाने जखम लवकर भरून येते.**

## आमची शेती पत्रिका आमचा अभिप्राय

✻ **'आरसीएफ शेती पत्रिका' शेतकऱ्यांना आधुनिक शेतीबाबत उत्तमप्रकारे मार्गदर्शन करणारे मासिक आहे.**

– राजेश जयंत शिंदे
मु. गोकुळनगर, पोस्ट–उमरखेड,
जिल्हा–यवतमाळ ४४५२०६ मो.९८५०६९००३०

✻ **या मासिकामुळे आमच्या सारख्या लहान शेतकऱ्यांना सुद्धा चांगली माहिती मिळाल्याने पीक उत्पादन वाढीसाठी मदत होते.**

– श्रीकांत पुरुषोत्तम वडतकार
मु. गाडेगाव, पोस्ट– घोडेगाव, तालुका– तेल्हारा,
जिल्हा– अकोला ४४४१०८, मो. ९१७५९३९३२५

✻ **आरसीएफच्या विविध खतांची आणि पीक लागवड व्यवस्थापनाबद्दल चांगली माहिती मिळाली. धन्यवाद !**

– ऋषिकेश विलास खोंडे
मु. राहोली खुर्द, पोस्ट–हिंगोली,
ता. जिल्हा–हिंगोली ४३१५१३ मो.९३७०५६३७२४

✻ **मी भारतीय सैन्यदलामधून निवृत्त झाल्यावर दोन वर्षापासूनशेतीकरतआहे. 'आरसीएफशेतीपत्रिका' शेतीप्रगती साठी उपयुक्त वाटली. कृपया माझे नाव सभासद यादी मध्ये समाविष्ट करावे ही विनंती.**

– खंडू मारुती कदम
मु. पोस्ट– यवत, तालुका–दौंड,
जिल्हा– पुणे ४१२२१४, मो. ९६७३७१११७६

✻ **शेतकऱ्यांच्या उज्वल भविष्यासाठी 'आरसीएफ शेती पत्रिका' निश्चितच उपयुक्त आहे.**

– शुभम रविंद्र सूर्यवंशी
मु. पोस्ट– टाकळी (प्र.दे.), तालुका– चाळीसगांव,
जिल्हा–जळगाव ४२४११६. मो.–७७५८८६०७१४

✻ **अत्यंत उपयुक्त अशी संपूर्ण माहिती ! लेखक आणि संपादक यांचे कार्य कौतुकास्पद आहे. आपणास धन्यवाद !**

– भूपेश तानाजी पेमारे
मु. पोस्ट– सुगवे, तालुका– कर्जत,
जिल्हा– रायगड ४१०२०१. मो. ९१५८२७७७२८

# पूर्व तयारी फळबाग लागवडीची

डॉ. शक्तीकुमार आनंदराव तायडे ( विशेषज्ञ -फळबाग शास्त्र), मु.पो. किन्हीराजा, तालुका- मालेगाव
जिल्हा- वाशीम- ४४४५०३, मो. ७३८७७२५९२६

फळझाडांची लागवड संरक्षणात्मक ओलिताखाली तसेच कोरडवाहू फळबाग म्हणून केली जाते. फळबाग दीर्घायुषी असल्याने त्याची योग्य पद्धतीने लागवड केल्यानंतर पुढील उत्पादनाच्या दृष्टीने विचार करता त्याची सुरुवातीच्या काळात योग्य प्रकारे निगा राखण्यावरच यश अवलंबून असते. कोरडवाहू फळबाग लागवडीसाठी सुरुवातीच्या दोन वर्षात त्यांची चांगल्या प्रकारे जोपासना करण्यासाठी प्रामुख्याने पर्जन्यविरहित काळात थोड्याफार प्रमाणात ओलितासाठी पाण्याची गरज असते.

हलक्या व मध्यम प्रतीची, पाण्याचा चांगल्या प्रकारे निचरा होणारी जमीन ही फळबाग लागवडीस योग्य आहे. फळझाडे वर्षानुवर्षे जमिनीतून अन्नद्रव्ये शोषून घेतात, म्हणून जमिनीची निवड करताना फळपिकानुरूप जमिनीची खोली, सुपीकता, पाण्याचा निचरा होण्याची क्षमता, मातीमध्ये असलेल्या द्राव्य व विद्राव्य क्षारांचे प्रमाण या महत्त्वपूर्ण बाबींचा विचार फळबाग लागवड करतांना केला पाहिजे. जास्त क्षारयुक्त जमिनीत फळझाड लागवड यशस्वी होत नाही. सर्वसाधारणपणे ५.५ ते ७.५ पर्यंत सामू असलेल्या जमिनीत फळबाग लागवड यशस्वी होते. फळबाग लागवड करण्याचे निश्चित झाले की, प्रथम आपल्याकडील उपलब्ध क्षेत्रामध्ये जमिनीचा उंचसखलपणा, डोंगरउतार, सपाट व जमिनीचा उथळपणा पाहून पिकाकरता योग्य जागेची निवड करावी. फळबागा अतिक्षारयुक्त, पाणथळ, पाण्याचा योग्य प्रकारे निचरा न होणाऱ्या कठीण सलग काळ्या दगडाच्या कातळ आलेल्या जमिनीत यशस्वी होत नाहीत. ज्या जमिनी उथळ आहेत, वर्षभर पाण्याची उपलब्धता आहे अशा जमिनीत कमी खोलवर पसरणाऱ्या चिकू, पेरू, केळी, आंबा या बागायती फळझाडांची निवड करावी. बागायती फळझाडांना नियमित पाणी द्यावे लागते अशा फळझाडांची लागवड करतांना पाण्याची उपलब्धता किती आहे याचा विचार लागवड करतांना केला पाहिजे. तसेच पाण्याचा निचरा न होणाऱ्या जमिनीमध्ये चर काढणे यासारख्या उपाययोजना करून निचऱ्याची व्यवस्था करून बागायती फळझाड लागवड करावी.

## हवामानानुसार लागवड

हवामानानुसार फळझाडांची लागवड ही महत्त्वपूर्ण बाब आहे. हवामानानुसार विविध फळझाडांची लागवड न झाल्यास फळे न येणे, फळे लागल्यास फळांची प्रत खालावणे, उशिरा फळे लागणे, रोग व किडीचा प्रादुर्भाव इत्यादी प्रश्न व समस्या भेडसावतात, म्हणून हवामानानुसार फळझाडे लागवड करावी. उदा. समुद्र किनाऱ्या लगतच्या उष्ण दमट डोंगर उतारावरील जमिनीत हापूस आंबा चांगला येऊ शकेल, परंतु अशा ठिकाणी संत्रा-मोसंबी आणि द्राक्ष बागा यशस्वी होणार नाहीत. दमट हवामानात लिंबूवर्गीय पीक, तसेच डाळिंब पीक कीड व रोगामुळे चांगले येत नाही.

## पाण्याची सोय

बागायती फळझाडांची लागवड करताना कितपत पाणीपुरवठा पुरेल किंवा पाण्याची उपलब्धता किती आहे याचा विचार करावा. कोरडवाहू पावसाच्या पाण्यावर येणाऱ्या फळपिकाच्या लागवडीच्या सुरुवातीस पहिली तीन ते चार वर्षे चांगल्या व

समाधानकारक वाढीसाठी पाण्याची आवश्यकता असते. नारळ, सुपारी, केळी, पपई, चिकू, मसाला पिके यांना इतर फळझाडांपेक्षा जास्त पाणी लागते. तसेच फळझाडावरील कीड व रोगांच्या नियंत्रणाकरता लागणाऱ्या आवश्यक फवारणीसाठीही पाण्याची आवश्यकता असते, म्हणून पाण्याच्या उपलब्धतेनुसार फळपिकांची निवड करावी.

## कलम-रोपांची उपलब्धता

फळबाग लागवडीची निश्चिती झाल्यावर पिकानुरूप चांगली जातिवंत कलमे रोपांची उपलब्धता खात्रीलायक माध्यम अगर सरकारी रोपवाटिका यांच्याद्वारे वेळीच करणे अत्यंत महत्त्वाची बाब आहे. अन्यथा मिळतील त्या निकृष्ट दर्जाची कलमे लावण्याची वेळ येते! त्याचप्रमाणे लागवडीसाठी आवश्यक साहित्य, खते, किटकनाशके यांची ही उपलब्धता वेळीच करणे अत्यंत गरजेचे असते. लागवड केल्यानंतर कलमांना आधार देण्यासाठी प्रत्येकी तीन बांबूंचा किंवा काठीचा आधार द्यावा.

## फळबागेची आखणी

मोठ्या प्रमाणावर फळझाडे लागवड करावयाची असल्यास वेगवेगळे विभाग पाडून व त्यांना जोडणारे रस्ते यांचे नियोजन आवश्यक असते. तसेच पाण्याच्या साठ्यासाठी शेततळे, पाण्याचा टाक्या, पाईपलाइन इत्यादींबाबतचे जास्त क्षेत्र वाया न घालवता नियोजन करणे गरजेचे आहे. रस्ते व पाण्याच्या लाईनकरता जास्त जागा वाया जाणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच जमिनीचा चढउतार, सपाटभाग, माळरान यानुसार विविध फळपिकांची पिकांच्या आवश्यकतेनुसार निवड करावी. विविध पिकांसाठी शिफारस केलेले अंतर व आकारमानाचे खड्डे भरावेत. फळझाड लागवडीसाठी खड्डे भरतांना पाऊस पडण्यापूर्वी एक महिना प्रखर सूर्यप्रकाशात उघडे ठेवावेत. पाऊस पडण्यापूर्वी पाच-सहा दिवस अगोदर भरून घ्यावेत. खड्डे भरतेवेळी अर्धा खड्डा मातीने भरून घ्यावा. अर्ध्या खड्ड्यात २ किलो नीम पेंड + १ किलो सुपर फॉस्फेट + १० ते २० किलो कंपोस्ट खत आणि २ ते ३ किलो सेंद्रिय खत मातीत मिसळून खड्डे भरून घ्यावेत. भरण्यापूर्वी वाळवीच्या बंदोबस्तासाठी खड्ड्याच्या तळाला व चारही बाजूंना २ टक्के मिथिलपॅराथिऑन पावडर प्रत्येकी १० ग्रॅम या प्रमाणात पसरावी.

फळझाडांची लागवड करताना योग्य लागवड पद्धत निवडावी. कारण याच गोष्टींवर फळझाडांचे उत्पादन तसेच रोग - किडींचा प्रादुर्भाव अवलंबून असतो. फळबाग लागवडीच्या चौरस मांडणी, आयत मांडणी, समभुज त्रिकोणी, षट्कोन पद्धत, समपातळी रेषा मांडणी पद्धत, सघन लागवड पद्धत अशा विविध पद्धती आहेत.

## लागवडीच्या पद्धती निवडताना घ्यावयाची काळजी

१) प्रत्येक फळझाडासाठी समान किंवा योग्य क्षेत्रफळ मिळावे. २) फळबागेतील आंतरमशागत, झाडावर फवारणी करणे आणि झाडांना पाणी देणे ही कामे सहज करता यावीत. ३) बागेचे व्यवस्थापन योग्य प्रकारे करता यावे. ४) फळबागेची वाढ होण्यासाठी मोकळी जागा सोडली पाहिजे. या जागेत फळझाडांची वाढ होईपर्यंत भाजीपाला पिके व हंगामी फुलझाडांची लागवड करावी.

**लागवडीची वेळ :** फळझाडांची लागवड शक्यतो खात्रीशीर पाऊस सुरू झाल्यावर पावसाच्या सुरुवातीस जून महिना अगर जुलै महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात करावी. जास्त पावसात अगर पावसाच्या शेवटी सप्टेंबर, ऑक्टोबरमध्ये फळझाड लागवड करू नये. पावसाच्या सुरुवातीस लागवड केलेली झाडे चांगली जोमदार वाढतात, काही कालावधीकरिता पाण्याचा ताणही सहन करू शकतात. जून-जुलैपर्यंत वेळेवर लागवड झाल्यास

झाडाची वाढ जोमाने होऊन मर होण्याचे प्रमाण कमी होते.

## लागवडीनंतरची काळजी

फळझाड लागवडीनंतर जमीन वाफशाचा अंदाज घेऊन पाणी व्यवस्थापन करावे. किडीचा प्रादुर्भाव आढळल्यास वेळेवर कीटकनाशकांची फवारणी करावी. फवारणी करण्यापूर्वी कृषी सल्लागाराचा सल्ला घ्यावा. फळझाड लागवड केल्यानंतर नवीन वाढ जनावरे खातात तसेच रोपे व कलमे तुडवतात म्हणून सुरुवातीच्या काळात जनावरांपासून वाचविण्यासाठी कुंपण महत्वाचे असते. कुंपणासाठी बागेभोवती करवंद, चिल्लार, शिकेकाई किंवा बांधावर निवडुंग यांची लागवड करून जिवंत कुंपण करावे. फळझाड लागवडीच्या वेळी नियोजन करून कृषी खाते, कृषी विद्यापीठे, कृषी संशोधन केंद्र यांचे तांत्रिक मार्गदर्शन, फलोद्यान संबंधित योजना व कृषी सल्ल्यानुसार लागवड केल्यास फळबाग लागवड यशस्वी होण्यास मदत होईल.

| अ. क्र. | फळझाडांचे नाव | लागवडीचे अंतर (मिटर) | झाडे प्रति हेक्टरी | शिफारस असलेले वाण |
|---|---|---|---|---|
| १ | आंबा | १० X १० (भारी जमिनीसाठी)<br>९ X ९ (हलक्या जमिनीसाठी) | १००<br>१२४ | कोकण सम्राट, केशर, रत्ना, हापूस, सिंधू, पायरी, कोकण रूची, तोतापुरी, सुवर्णा, फुले अभिरुची (लोणच्यासाठी) |
| २ | पेरू | ६ X ६<br>३ X २ (घन लागवडीसाठी) | २८७<br>१६३३ | सरदार ( एल– ४९), ललित चीतीदार |
| ३ | डाळींब | ४.५ X ३ | ७४० | फुले भगवा सुपर, फुले भगवा, गणेश, मृदुला, फुले आरक्ता, फुले अनारदाना |
| ४ | केळी | १.५ X १.५ | ४४४४ | ग्रँड नाईन, श्रीमंती, बसराई, अर्धापूरी |
| ५ | चिक्कू | १० X १० | १०० | कालीपत्ती, क्रिकेट बॉल |
| ६ | द्राक्षे | ३ X १.५ | २२२२ | तास–ए–गणेश, सोनाका, माणिक चमन, शरद सीडलेस, फ्लेम सीडलेस |
| ७ | सीताफळ | ५ X ५ | ४०० | बाळानगर, फुले पूरंदर, फुले जानकी, अर्का सहान |
| ८ | आवळा | ७ X ७ | २०५ | कृष्णा, कांचन, बनारसी, आनंद–१, चकैया |
| ९ | अंजीर | ४.५ X ३ | ७४० | पुना फिग, दिनकर, फुले राजेवाडी, एक्सेल |
| १० | बोर | ६ X ६ | २७८ | उमराण, मेहरूण, कडाका, गोला |
| ११ | जांभूळ | १० X १० | १०० | कोकण बहाडोली |
| १२ | नारळ | ७.५ X ८ | १६६ | बाणवली, टी X डी |
| १३ | चिंच | १० X १० | १०० | प्रतिष्ठान, नं– २६३, अकोलास्मृती |
| १४ | लिंबू | ६ X ६ | २७७ | पीडीकेव्ही चक्रधर, साई सरबती, विक्रम, प्रमालीनी |
| १५ | मोसंबी | ६ X ६ | २८७ | फुले मोसंबी |
| १६ | काजू | ८ X ८ | २०० | वेंगुर्ला १, वेंगुर्ला ४, वेंगुर्ला ६, वेंगुर्ला ७, वेंगुर्ला ९ |

# कोरडवाहू तेलबिया पिकांसाठी एकात्मिक अन्नद्रव्यांचे व्यवस्थापन

**सुमित सुर्यवंशी, अखिल भारतीय समन्वयित कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, परभणी**
**डॉ. प्रमोद सिनगारे, (मृद विज्ञान व कृषी रसायनशास्त्र विभाग), राजीव गांधी कृषी महाविद्यालय, परभणी**
**डॉ.संतोष पिल्लेवाड, (मृद विज्ञान व कृषी रसायनशास्त्र), केळी संशोधन केंद्र, नांदेड. मो. ९४०४५९२४५६**

भारतामध्ये तेलबियांची विविधता अधिक असून, जागतिक पातळीचा विचार करता लागवड ही १४ ते १५ टक्के इतकी आहे. मात्र, खाद्य तेल उत्पादनात केवळ ६ ते ७% इतकाच वाटा आहे. पर्यायाने दरवर्षी खाद्य तेल आयातीचे प्रमाण वाढत असून, त्याचा ताण अर्थव्यवस्थेवर येत असतो. सोयाबीन, भुईमूग, सूर्यफूल, मोहरी, तीळ ही पारंपरिक लागवडीखालील प्रमुख तेलबिया पिके आहेत. देशातील सुमारे तेलबिया उत्पादनांपैकी ८५ टक्के वाटा भुईमूग, सोयाबीन आणि मोहरी यांचा एकत्रितपणे आहे. भारतात खरीप हंगामात सोयाबीन, भुईमूग, सूर्यफूल, तीळ आणि एरंडी ही प्रमुख पिके घेतली जातात.

भरघोस उत्पादन घेण्यासाठी खत व्यवस्थापन हा एक महत्वाचा घटक असतो. शेती उत्पादनाची उच्चतम पातळी गाठण्यासाठी तसेच उत्पादनात सातत्य राखण्यासाठी जमिनीचे आरोग्य उत्तम असणे आवश्यक आहे. पाण्याची उपलब्धता आणि जमीन यांचा योग्य समन्वय साधून फायदेशीर पीक पद्धतीचा वापर हे कोरडवाहू शेतीतील महत्त्वाचे सूत्र आहे. एकात्मिक व्यवस्थापनातून पीक उत्पादनासह जमिनीची सुपीकता तसेच उत्पादनाची गुणवत्ता वाढण्यास मदत होते. कोरडवाहू शेतीतील हेक्टरी उत्पादन वाढविणे, प्रतिकूल वातावरणात चांगले उत्पादन मिळणे आणि उत्पादन खर्च कमी करणे या बाबी महत्त्वाच्या असतात. कोरडवाहू शेती उत्पादन वाढीसाठी उपलब्ध नैसर्गिक स्त्रोतांचा (जमीन, हवामान, पाणी) शास्त्रीयदृष्ट्या पुरेपूर उपयोग करून सुधारित तंत्रज्ञानाद्वारे विकास करता येईल.

## एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन

रासायनिक खताबरोबरच शेणखत, कंपोस्ट, जीवाणू संवर्धक, तळी, विहिरी, नदी या मधील गाळ इत्यादी पर्यायी खतांचा वापर करून रासायनिक खतांची मात्रा कमी करता येते. जीवाणू संवर्धने रायझोबियम, ॲझोस्पिरीलम, ॲझोटोबॅक्टर, यांचा वापर केल्यास रासायनिक खतांची मात्रा २० टक्क्यांनी कमी करता येईल. ही पर्यायी खते स्वस्त असतात.

## एकात्मिक खत व्यवस्थापन

- जमिनीची सुपीकता टिकून राहते.
- रासायनिक खतांबरोबर शेणखत, गांडूळखत इत्यादी जैविक खतांचा वापर करता येतो.
- जमिनीतील अन्नद्रव्यांच्या प्रमाणात वाढ होते. जमिनीचे भौतिक, जैविक आणि रासायनिक गुणधर्म सुधारतात.
- भरखते व हिरवळीची खते वापरल्याने जिवाणूद्वारे जमिनीतील अविद्राव्य स्थितीतील अन्नद्रव्ये विद्राव्य स्थितीत येतात आणि पिकांना सहज उपलब्ध होतात.

## रासायनिक खतांची मात्रा अवलंबून असणारे घटक

- रासायनिक खतांचा वापर करतांना खतांची जमिनीनुसार निवड, खत देण्याची वेळ, मात्रा व खते देण्याची पध्दती इत्यादी बाबी लक्षात घेणे आवश्यक असते.
- उपलब्ध अन्नद्रव्यांचे प्रमाण, पीक पद्धती व पीक जाती यानुसार खत वापर करावा.

(पुढील भाग पान नं. १७ वर)

# सुरंगी – सुगंधी आणि औषधी वनस्पती

**श्री. सचिन ढगे, डॉ. जी.डी. शिर्के, (विभाग प्रमुख) डॉ. जे. एच. कदम, (सहयोगी प्राध्यापक)**
**औषधी, सुगंधी, मसाले, वने व उपवने पिकांचे काढणीपश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था,**
**किल्ला रोहा – रायगड (डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली अंतर्गत)**

कोकणासह सर्वत्र वृक्षसंवर्धनाची परंपरा रुजलेली आहे. मात्र गेल्या काही दशकांमध्ये तत्कालीन किंवा अल्प फायद्यासाठी वृक्षतोड होत चालल्याने पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. कोकणातील विशेष आणि अतिदुर्मिळ असणारे झाड म्हणजे 'सुरंगी' होय. सण, समारंभ, रूढी-परंपरा यातून विविध वृक्षांच्या औषधी आणि पर्यावरणातील महत्त्वाकडे नेहमीच लक्ष वेधले जात असते. अशा औषधी वृक्षांवर अनेक कुटुंबाची उपजीविका आजही अवलंबून असल्याचे दिसून येते. साधारणपणे कोकणातल्या बहुतांश गावांमध्ये छोट्यामोठ्या जंगलाचे 'देवराई' म्हणून जतन केले जाते. यामध्ये एक महत्त्वाचा वृक्ष म्हणून 'सुरंगी' वृक्षाने आपले स्थान निश्चित केले आहे. कोकणातील कोकण कृषी विद्यापीठ दापोली परिसरामध्ये काही प्रमाणात तर रत्नागिरी व सिंधुदुर्ग परिसरामधील घाटातील जंगलांमध्ये हे वृक्ष अधिक प्रमाणात आढळून येतात.



सुरंगी या झाडाचे शास्त्रीय नाव 'ममीया सुरीगा' **(Mammea Suriga)** असे आहे. ही सदाहरित वनस्पती आहे. या झाडाची बाहेरील साल पिवळसर राखाडी रंगाची व आतील साल लालसर रंगाची गुळगुळीत असते. चमकदार, शिरायुक्त ग्रंथी तसेच दाट विलग ठिपके मध्यभागी असतात. झाडाची गुच्छ असलेली फुले एकलिंगी किंवा उभयलिंगी आढळून येतात. असंख्य मुक्त पुंकेसर फुलांच्या मध्यभागी विखुरलेले दिसतात. पाकळ्या चार किंवा क्वचितच सात दिसून येतात. फुलांचा रंग दुधाळ पांढरा किंवा पिवळसर असतो.

हे झाड साधारणपणे पाच मीटर उंचीचे मध्यम आकाराचे असते. पक्षी किंवा प्राणी यांच्या मार्फत तसेच मानवी कृतीद्वारे याच्या बियाण्याचे प्रसारण होत असते.

मलबार किनाऱ्यापासून दक्षिण कोकण किनाऱ्यापर्यंत आणि मध्य सह्याद्रीच्या उत्तर भागात सुरंगीच्या झाडाचे प्रमाण जास्तीत जास्त दिसून येते.

या प्रजाती विविध कीटक, विषाणू आणि बुरशीसाठी अतिसंवेदनशील असतात.

या झाडाची फुले, फळे, साल, लाकूड अशा विविध घटकांचा वापर सौंदर्यप्रसाधने, औषधांमध्ये



(पुढील भाग पान नं. १६ वर)




दिनांक ८ आणि ९ जून २०२२ रोजी वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील आरसीएफ कार्यालयांमार्फत वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी आरसीएफ जिल्हाप्रभारी, त्यांचे सहयोगी आणि संस्थात्मक मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.



जिल्हा – रत्नागिरी



जिल्हा – औरंगाबाद



जिल्हा – भंडारा



जिल्हा – बुलढाणा

# उज्ज्वल भविष्याचे हेच धोरण





जिल्हा – नंदुरबार



जिल्हा – यवतमाळ



जिल्हा – सिंधुदुर्ग



जिल्हा – वर्धा



जिल्हा – अकोला



जिल्हा – जळगाव



जिल्हा – कोल्हापूर




जिल्हा – लातूर

**कर्म करा लाख मोलाचे, रक्षण करा वृक्षवल्लींचे**

# बियाणे खरेदी करताना दक्षता हवीच...

**प्रा. हरिष फरकाडे, सहाय्यक प्राध्यापक (वनस्पती रोगशास्त्र विभाग),**
**श्रीशिवाजी उद्यानविद्या महाविद्यालय, अमरावती. मो. ८९२८३६३६३८**

पीक उत्पादनात बियाणे, खते, कीडनाशके आदी निविष्ठांचा वापर महत्वाचा ठरतो. यामध्ये बियाणे निवड खूप महत्वाची बाब असल्याने शेतकऱ्यांनी अत्यंत दक्ष राहून याची खरेदी करायला हवी, त्यासाठी काही गोष्टी माहित करून घेतल्यास फसवणूक टाळणे शक्य होईल.

## बीजप्रमाणीकरण

बियाण्याच्या बाबतीत बाजारात 'प्रमाणित बियाणे' व 'सत्यतादर्शक बियाणे' विक्रीस येते. बियाणे अधिनियमांतर्गत विविध राज्यांमध्ये बियाणे प्रमाणिकरणासाठी बीज प्रमाणिकरण यंत्रणा स्थापन करण्यात आल्या आहेत. या बियाण्याच्या उत्पादनासाठी बीज निर्मिती क्षेत्र (सीड प्लॉटस) घेतले जातात, त्यांना बीज प्रमाणिकरण यंत्रणेचे अधिकारी वेळोवेळी भेट देत असतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली चाचण्या घेतल्यानंतर या यंत्रणेमार्फत बियाणे प्रमाणिकरण केले जाते. या बियाण्याच्या दर्जाबाबत बियाणे उत्पादक खात्री देत असतात.

## बियाणे खरेदी करण्यापूर्वी शेतकऱ्यांनी पुढीलप्रमाणे दक्षता घ्यावी.

१. परवानाधारक विक्रेत्याकडूनच बियाण्याची खरेदी करावी.

२. प्रामुख्याने बीज प्रमाणीकरण यंत्रणेने प्रमाणित केलेले बियाणे खरेदी करण्यास प्राधान्य द्यावे.

३. बियाणे खरेदीची विक्रेत्याकडून पक्की पावती घ्यावी. त्यावर शेतकऱ्याचे पूर्ण नाव, पत्ता, पिकाचे नाव, प्रकार, जात, प्लॉट नंबर, उत्पादकाचे नाव, विक्रीची किंमत असावी.



४. पक्क्या पावतीवर विक्रेत्याची व शेतकऱ्याची सही किंवा अंगठा निशाणी असावी. कच्चे बिल स्वीकारु नये.

५. बियाणे खरेदी करताना पिशवीच्या लेबल वरील पिकाचे नाव, पिकाची उगवण शक्ती, भौतिक व अनुवंशिक शुध्दता टक्केवारी, बियाणे चाचणीची तारीख, महिना व वर्ष, वजन, बीज प्रक्रियेसाठी वापरलेले रसायन, आदी गोष्टीचा उल्लेख तपासावा व माहिती करून घ्यावी.

६. पिशवीवर असलेल्या किंमतीपेक्षा जास्त भावात बियाणे खरेदी करु नये. पॅकिंगवर किंमत छापणे कायद्याने बंधनकारक आहे. बियाणे पिशवीवर किंमत छापली नसल्यास किंवा विक्रेता पिशवीवरील किंमतीपेक्षा जास्त मागणी करीत असेल तर ही बाब जिल्हा वजनमापे निरीक्षकाच्या आणि कृषी विभागाच्या निदर्शनास आणावी. या विभागाचे अधिकारी जिल्हा व तालुका स्तरावर कार्यरत असतात.

७. बियाणे खरेदी पावतीवर छापील बिल क्रमांक असल्याची खात्री करावी. बियाणे पिशवी ही तिन्ही बाजुनी शिवलेली असावी. तसेच वरची बाजुही प्रमाणपत्रासह शिवलेली असावी.

८. पेरणीसाठी पिशवी फोडताना ती खालील बाजुने फोडावी. त्यामुळे पिशवी सोबत असलेले लेबल व बीज प्रमाणीकरण यंत्रणेचा टॅग व्यवस्थित राहिल. पिशवीसह हे लेबल, टॅग जपून ठेवावेत.

९. मुदतबाह्य झालेले, तसेच पॅकिंग फोडलेले सुटे बियाणे खरेदी करु नये.

बियाण्याविषयी काही तक्रार असेल तर तालुका कृषी अधिकारी, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद कृषी विभागाकडे लेखी तक्रार द्यावी. सत्यतादर्शक बियाण्यामध्ये प्रमाणीकरण यंत्रणेचे प्रमाणपत्र वगळता अन्य सर्व बाबी वरीलप्रमाणे असतात.

## बियाण्यांचे प्रकार

- पैदासकार बियाणे (Breeder seed)- टॅगचा रंग पिवळा
- पायाभूत बियाणे (Foundation seed) –टॅगचा रंग पांढरा
- प्रमाणित बियाणे (Certified seed) – टॅगचा रंग निळा
- सत्यप्रत बियाणे (Truthful seed) – टॅगचा रंग हिरवा
- त्यापैकी पायाभूत, प्रमाणित बियाणे शेतकऱ्यांच्या वापरासाठी आहेत

## कृषीनिविष्ठा /परवाना धारक विक्रेत्यांनी बियाणे विक्रीबाबत घ्यावयाची दक्षता

❑ बियाणे भावफलक दर्शनी भागात लाऊन त्यावर कंपनीनिहाय, जातीनिहाय बियाण्याचा साठा व दर नमूद करावेत.

❑ लेबलवर दिशाभूल करणारा कोणताही मजकूर नसावा.

❑ बियाण्याची विक्री परवाना घेऊनच करावी. बियाणे खरेदीची पक्की पावती द्यावी. त्यावर वरील प्रमाणे सर्व मजकूर असावा.

❑ बियाणे, खरेदी – विक्रीचा मासिक अहवाल गटविकास अधिकारी व कृषी विकास अधिकारी यांना नियमित सादर करावा.

❑ परवाना दिलेल्या ठिकाणीच बियाण्याची विक्री किंवा साठा करावा. बियाणे परवाना शेतकऱ्यास दिसेल अशा ठिकाणी लावावा.

❑ शेतकऱ्यांची कृषीनिविष्ठांबाबत फसवणूक होऊ नये म्हणून अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ या कायद्यातंर्गत कायदे तयार करण्यात आलेले आहेत. उदा. बी- बियाणे नियम १९६८, बियाणे (नियंत्रण) आदेश १९८३ इत्यादी.



## माझ्या मनातले...

**काही माणसं स्वत: आनंदीत रहात नाहीत आणि आपल्या जवळच्या माणसांना सुद्धा आनंदाने जगू देत नाहीत. आपण इतरांसमवेत आपली तुलना न करता आणि अपेक्षाचं ओझं न ठेवता फक्त आपल्या कष्टांवर प्रामाणिकपणे विश्वास ठेऊन कार्य करीत राहिल्यास आयुष्यात निश्चितपणे आनंद मिळेल. खरे सांगायचे तर... वेळेच्या अगोदर आणि नशीबात असेल त्यापेक्षा अधिक कोणालाच कधी मिळत नसतं ! त्यामुळे स्वत:चा आनंद स्वत:वरच अवलंबून ठेवा. आपला आनंद नेहमी स्वत:वरच अवलंबून ठेवला की आपलं समाधान कोणी हिरावून घेऊ शकत नाही !**

## आरोग्यम धनसंपदा

**बाजारात उपलब्ध बऱ्याच खाद्यपदार्थात गोडवा वाढवणारे कृत्रिम पदार्थ (Sweeteners) वापरलेले असतात. त्यांची चव आपल्याला साखरे प्रमाणेच भासते. अशा पदार्थांचे दीर्घकाळ सेवन केल्यास मधुमेह, स्थूलपणा, हृदयविकार तसेच मूत्राशयाचा कर्करोग होऊ शकतो.**

## सुरंगी – सुगंधी आणि औषधी वनस्पती...

(पान नं. ११ वरून पुढे)

तसेच फर्निचर उद्योगांमध्ये केला जातो.

साधारणपणे हे झाड ७० वर्षापर्यंत जगते. फेब्रुवारीपासून एप्रिलपर्यंत दोन वेळा फुलांचा बहर येतो. सकाळी लवकर खोडाला कळ्या येतात. नऊ ते दहा वाजण्याच्या पर्यंत त्या पूर्णपणे उमलतात. या पिवळसर पांढऱ्या सुगंधी फुलांमध्ये परागकण मोठ्या प्रमाणावर असतात.

तळकोकणातील सुमारे आठ ते दहा गावांमध्ये या वृक्षांची जोपासना मोठ्या प्रमाणावर केली जाते. सोनसुरे, टाक, शिरोडा इत्यादी गावांना 'सुरंगीच्या सुगंधाचे गाव' अशी नवी ओळख मिळाली आहे. या झाडाची फुले, फळे, साल, लाकूड, डिंक अशा विविध वनोत्पादनाच्या विक्रीवर या गावांची अर्थव्यवस्था आधारलेली आहे. या झाडाची व्यावसायिक लागवड वाढवण्याच्या उद्देशाने त्याची कलमे तयार करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

## सुविचार

जे बदलता येईल ते बदला, जे बदलता येत नाही ते स्वीकारा आणि जे स्वीकारता येत नाही त्यापासून दूर रहा, परंतु स्वतःला आनंदीत ठेवा...!

## संत वाणी

मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचे कारण ।।
मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छा ते ।।
मने इच्छा पुरविली । मन माऊली सकलांची ।।
प्रसन्न आपआपणास । गति अथवा अधोगती ।।
नाही नाही अन्य दैवत । तुका म्हणे दूसरे ।।

–– संत तुकाराम महाराज

## विचारमंथन

परमेश्वराचे अस्तित्व जिथे पहावे तिथे आहे. ते जाणवण्यासाठी स्वत: कसे वागावे हे प्रथम पहावे. परमेश्वर आहे की नाही हे जाणण्याकरिता आपल्याला बुद्धी दिली आहे. त्याचे अस्तित्व आहे हे काहीजणांनी अनुभवलेले आहे. फक्त आपण तो अनुभव घेऊ शकलेलो नाही. केवळ तो अनुभव आपल्याला अजून आला नाही म्हणून त्याचे अस्तित्व नाकारता येणार नाही, कारण आपली वाटचाल त्यादिशेने अजून कदाचित झालेली नसेल. बीजगणितामध्ये उदाहरण सोडविताना एक अज्ञात 'क्ष' घ्यावा लागतो. उदाहरणाचे उत्तर येईपर्यंत त्या 'क्ष' ची खरी किंमत काय आहे हे आपल्याला समजत नाही. पण हा 'क्ष' घेतल्या शिवाय चालत नाही! त्याप्रमाणे जीवनाचे कोडे सोडविण्यासाठी आज अज्ञात असा भगवंत आपण गृहित धरला पाहिजे. जगात सर्व चमत्कार करता येतील पण ईश्वरी शक्तीला शरण जाऊन त्याला जाणण्याची तीव्र तळमळ किंवा इच्छा निर्माण होणे ही खूपच कठीण गोष्ट आहे. त्याच अस्तित्व समुद्रासारखे असून आपले अस्तित्व त्यामधील एखाद्या लहान थेंबा सारखे आहे ! भगवंत निर्गुण, निराकार आणि अव्यक्त आहे, त्याचे स्वरूप जीवनाचे कोडे ज्यादिवशी सुटेल त्याक्षणीच आपल्याला कळेल!

आपण जीना चढतो ते जिन्यासाठी नसून वरच्या मजल्यावर जाण्यासाठी असते. वरच्या मजल्यावर जाणे हे 'साध्य' असून जिना हे 'साधन' आहे. त्याचप्रमाणे व्रत वैकल्ये, तीर्थयात्रा, भजन–पूजन, नेमधर्म ही साधने असून ईश्वरप्राप्ती हे आपले साध्य आहे. आपण ईश्वरनिर्मित सृष्टीमध्ये बदल करण्याची आवश्यकता नाही. बदल करायचा तर तो स्वत: मध्येच करायला हवा!

## कोरडवाहू तेलबिया पिकांसाठी एकात्मिक अन्नद्रव्यांचे व्यवस्थापन...

(पान नं. १० वरून पुढे)

➢ रासायनिक खतांची मात्रा आपणास वेगवेगळ्या पध्दतीने ठरवता येते. यामध्ये प्रामुख्याने माती परीक्षण अहवालानुसार, कृषी विद्यापीठाच्या शिफारसीत खत मात्रेनुसार किंवा पाने व देठ परीक्षण करुन खत मात्रा ठरवता येते.

### जिवाणू संवर्धकांचा वापर

- या जिवाणू खतांचा जमिनीचा पोत सुधारण्यासाठी उपयोग होतो. ॲझोटोबॅक्टर, रायझोबियम, ॲझोस्पीरिलियम, निळे-हिरवे शेवाळ आणि ॲझोला पिकास नत्र पुरवितात.
- बॅसीलस पॉलिमिक्स, बॅसीलस मेगाटेरिअम इत्यादी जिवाणू स्फुरदाची उपलब्धता वाढवितात.
- मायकोराईझा जिवाणू स्फुरद, पालाश, नत्र, कॅल्शियम, सोडीयम, जस्त, तांबे जमिनीतून शोषण करण्यास मदत करतात.
- जैविक खते घन किंवा द्रव स्वरुपात उपलब्ध आहेत.
- जैविक खते बीजप्रक्रियेद्वारे, शेणखतात मिसळून किंवा ठिबक सिंचनातुन देता येतात.
- जैविक खतांची बीजप्रक्रिया बुरशीनाशकाच्या बीजप्रक्रियेनंतर करावी. बीजप्रक्रिया करताना घन स्वरुपात जैविक खते असल्यास गुळाचा मिश्रणासाठी वापर केल्यास जीवाणू खत बियांना सहज चिटकते.

### जस्त- सूक्ष्म अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढविणारे जिवाणू

- रासायनिक खतांद्वारे दिलेले जस्त ७५ टक्के मातीत स्थिर होते. जस्त विरघळविणाऱ्या जिवाणूंमध्ये बॅसिलस, मेगाटेरिअम व सुडोमोनस स्ट्रायटा हे जिवाणू आणि ट्रायकोडर्मा व्हिरीडी या बुरशीचा समावेश होतो.
- हे सूक्ष्मजीव विविध प्रकारची सेंद्रिय व असेंद्रिय आम्ले स्त्रवतात. या आम्लांमुळे अविद्राव्य स्वरुपातील जस्त विद्राव्य स्वरुपात पिकास उपलब्ध होत असते.
- माती परीक्षण अहवालामध्ये सूक्ष्म अन्नद्रव्यांची जमिनीत कमतरता आढळून आल्यास कमतरता असलेली अन्नद्रव्ये ती अन्नद्रव्ये पुरविणाऱ्या खतांद्वारे शिफारसीप्रमाणे द्यावीत.
- सूक्ष्म अन्नद्रव्ये पुरविणारी खते जमिनीतून द्यावयाची झाल्यास ती शेणखत, कंपोस्ट खत अथवा गांडूळ खतासोबत दिल्यास परिणामकारक ठरतात.
- कोणत्याही परिस्थितीत सूक्ष्म अन्नद्रव्ये पुरविणारी खते इतर रासायनिक खतांमधून मिसळून देऊ नयेत.
- फवारणीद्वारे सूक्ष्म अन्नद्रव्येयुक्त खते देतांना योग्य तीव्रतेचे द्रावण वापरावे.

### पीक व्यवस्थापन

### सोयाबीन -

**जमीन :** मध्यम काळी पोयट्याची, चांगली निचरा होणारी.

**वाण :** (सरासरी उत्पादन २० ते २८ क्विंटल प्रति हेक्टर) फुले कल्याणी, फुले अग्रणी, जेएस-३३५, अहिल्या-४, सुवर्णसोया, पीडीकेव्ही यलो गोल्ड, फुले संगम, जेएस (२०-३४), एसएसएस-१६२

**बियाणे :** सलग पेरणीसाठी ७५ ते ८० किलो प्रति हेक्टर तर टोकण पेरणीसाठी ४५ ते ५० किलो प्रति हेक्टर बियाणे वापरावे.

**बीजप्रक्रिया :** बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण करण्यासाठी प्रति किलो बियाण्यास ३ ग्रॅम कार्बेन्डॅझिम किंवा ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा चोळावे.

तसेच नत्र स्थिरीकरणासाठी रायझोबियम २५० ग्रॅम + स्फुरद विरघळविणारे जिवाणू खत २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाण्यास चोळावे.

**पेरणीची वेळ :** पेरणी खरीपात जुन किंवा जुलै च्या पहिल्या आठवड्यात वापसा आल्यावर करावी.

**आंतरपिके :** या पीक पद्धतीमध्ये तीळ + सोयाबीन (३:१), सोयाबीन + तूर (४: २), कापूस + सोयाबीन (१:१ / २:१) याप्रमाणात ओळीमध्ये पेरणी फायदेशीर ठरते.

**पेरणीचे अंतर :** पेरणी ४५ X ५ सें.मी. (भारी जमीन) किंवा ३० X १० सें.मी. (मध्यम जमीन) अंतरावर करावी.

**काढणी :** सोयाबीन शेंगांचा रंग पिवळट तांबुस झाल्यानंतर, पक्वतेच्या ९० ते ११० दिवसांत काढणी करावी. पीक काढणीस उशीर झाल्यास शेंग फुटण्यास सुरुवात होते.

**उत्पादन :** सोयाबीन पिकाचे उत्पादन २० ते २५ क्विंटल प्रति हेक्टरी मिळते.

## तीळ –

**जमीन :** मध्यम ते भारी, पाण्याच्या चांगला निचरा असलेली जमीन निवडावी.

**वाण :** (सरासरी उत्पादन ५ ते ९ क्विंटल प्रति हेक्टर) खरीप – एकेटी–६४, फुले तीळ नं. १, तापी, पद्मा, जेएलटी–४०८

**बियाणे :** पेरणीसाठी हेक्टरी २.५ ते ३ किलो बियाणे वापरावे.

**बीजप्रक्रिया :** बियाण्यापासून व जमिनीम धून उद्‌भवणारे बुरशीजन्य रोग होऊ नये म्हणून कार्बेन्डॅझिम किंवा ट्रायकोडर्मा ४ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळावे. त्यानंतर २५ ग्रॅम ॲझोटोबॅक्टर प्रति किलो बियाणे या प्रमाणात लावावे.

**पेरणीची वेळ :** मान्सूनचा पाऊस झाल्यावर आणि योग्य वाफसा आल्यावर जूनच्या दुसऱ्या आठवड्यापासून जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत.

**आंतरपिके :** या पीक पद्धतीमध्ये तीळ + सोयाबीन (३:१), तीळ + तुर (२:१), तीळ + कापुस (३:१), तीळ + मुग (३;३), तीळ + ज्वारी (३:१) याप्रमाणात ओळीमध्ये पेरणी फायदेशीर ठरते.

**पेरणीचे अंतर :** ४५ X १० सें.मी किंवा ३० X १५ सें.मी अंतरावर अनुक्रमे ४५ सें.मी. अंतराच्या पाभरीने पेरणी करावी. पाभरीने पेरणी करताना बियाण्यास बियाण्या एवढीच बारीक वाळू अथवा चाळून घेतलेले शेणखत मिसळावे, त्यामुळे बियाण्याचे वितरण प्रमाणशीर होते. पेरणी २.५ सें.मी पेक्षा जास्त खोलीवर करु नये.

**विशेष बाब :** अधिक उत्पादनासाठी २ टक्के युरीयाची फवारणी पीक फुलोऱ्यात आणि बोंडे वाढीच्या अवस्थेत असतांना करावी.

**काढणी :** साधारणपणे ७५ % पानाचा व खोडाचा रंग पिवळसर होतो तेव्हा पीक काढणीस योग्य झाले असे समजावे. साधारणत: ८० ते ९५ दिवसात पीक काढणीस येते. काढणी लवकर केल्यास बोंडातील तीळ पोचट व बारीक राहून उत्पादनात घट येते, काढणी उशिरा केल्यास बोंडे फुटून तीळ शेतात गळून पडते म्हणून वेळेवर काढणी करावी.

**उत्पादन :** पावसाचे वितरण चांगले असल्यास साधारणत: हेक्टरी ६ ते ७ क्विंटल जिरायताखाली उत्पादन मिळते.

## सूर्यफूल –

**जमीन :** पाण्याचा चांगला निचरा होणारी मध्यम ते भारी जमीन निवडावी. आम्लयुक्त आणि पाणथळ जमिनीत हे पीक चांगले येत नाही.

**वाण :** (सरासरी उत्पादन १२ ते १८ क्विंटल प्रति हेक्टर) मार्डेन, टीएएस–८२, पीकेव्हीएसएच–२७ (संकरित), पीडीकेव्हीएसएच–९५२ (संकरित) फुले भास्कर, फुले रविराज (संकरित)

**पूर्व मशागत :** जमीनीची खोल नांगरट करुन त्यानंतर कुळवाच्या उभ्या आडव्या दोन ते तीन पाळ्या द्याव्यात. शेवटच्या कुळवाच्या पाळीपूर्वी हेक्टरी २० ते २५ गाड्या चांगले कुजलेले शेणखत वापरावे.

**बियाणे :** सूर्यफूलाच्या पेरणीसाठी सुधारित वाणाचे ८ ते १० किलो बियाणे आणि संकरित वाणाचे ५ ते ६ किलो बियाणे प्रति हेक्टरी वापरावे.

**बीजप्रक्रिया :** 'मर' रोगाच्या प्रतिबंधासाठी २ ते २.५ ग्रॅम 'थायरम' किंवा 'ब्रासिकॉल' प्रतिकिलो बियाण्यास चोळावे. 'केवडा' रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी ६ ग्रॅम 'ॲप्रॉन' (३५ एस.डी.) प्रति किलो बियाण्यास चोळावे. तसेच विषाणूजन्य (नॅक्रॉसिस) रोगाच्या प्रतिबंधासाठी 'इमिडॅक्लोप्रिड' ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास लावावे. त्यानंतर 'ॲझोटोबॅक्टर' हे जिवाणू खत २५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास पेरणीपूर्वी लावावे.

**पेरणीची वेळ :** मान्सूनचा पाऊस झाल्यावर आणि योग्य वाफसा आल्यावर जुलैच्या पंधरवड्या पर्यंत.

**आंतरपिके :** आंतरपीक पध्दतीत सूर्यफूल + तूर (२:१ किंवा २:२) आणि भुईमूग + सूर्यफूल (६:२ किंवा ३:१) या प्रमाणात ओळीने पेरणी केल्यास उत्पादनात चांगली वाढ होते.

**पेरणीचे अंतर :** मध्यम ते खोल जमीन – ४५ X ३० सें.मी., भारी जमीन – ६० X ३० सें.मी. तसेच संकरित वाण आणि जास्त कालावधीच्या वाणाची लागवड – ६० X ३० सें.मी. अंतरावर करावी.

**विशेष बाब :** मधमाश्यांचे प्रमाण फुलोऱ्याच्या काळात जास्त राहील असे नियोजन करावे (फुलावर स्वच्छ, सुती कपडा किंवा मऊ कापडाने बांधलेल्या हाताने परागीकरण केल्यास उत्पन्नात वाढ दिसून येते)

**काढणी :** सूर्यफूलाची पाने, देठ व फूलाची मागील बाजू पिवळी झाल्यानंतर पिकाची कापणी करावी. कणसे चांगली वाळवून नंतर मळणी करावी.

**उत्पादन :** कोरडवाहू पिकापासून प्रति हेक्टरी ८ ते १० क्विंटल, संकरित वाणापासून १२ ते १५ क्विंटल आणि बागायती/संकरित वाणापासून प्रति हेक्टरी १५ ते २० क्विंटल उत्पादन मिळते.

## भुईमूग –

**जमीन :** मध्यम, भुसभुशीत, चुना व सेंद्रिय पदार्थ योग्य प्रमाणात असलेली व पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी.

**वाण :** (सरासरी उत्पादन २२–३५ क्विंटल प्रति हेक्टर) पीडीकेव्ही जी ३३५, एके ३०३, एके १५९, जेएल–२४, एसबी–११, फुले भारती, फुले उन्नती, फुले व्यास, फुले उनप.

**बियाणे :** भुईमुगाच्या उपट्या जातीसाठी १०० ते २०० किलो बियाणे तर पसऱ्या जातीसाठी ८० किलो बियाणे प्रति हेक्टरी वापरावे.

**बीजप्रक्रिया :** मर रोगाच्या प्रतिबंधासाठी ५ ग्रॅम 'थायरम' किंवा २ ग्रॅम 'कार्बेन्डॅझिम' किंवा ३ ग्रॅम 'मॅन्कोझेब' किंवा ५ ग्रॅम 'ट्रायकोडर्मा' जैविक बुरशीनाशक चोळावे. नंतर एक किलो बियाण्यास २५ ग्रॅम स्फुरद विरघळणारे जीवाणू संवर्धक (बायोला–पीएसबी) चोळावे बीजप्रक्रिया केलेले बियाणे सावलीत सुकवून पेरावे.

**पेरणीची वेळ :** खरीपासाठी पेरणी १५ जून ते १५ जुलै या दरम्यान करावी.

**आंतरपिके :** खरीप भुईमूग पिकात सोयाबीन, सूर्यफूल, तीळ, मूग, उडीद, तूर ही आंतरपिके (६: २) या प्रमाणात, भुईमूग + ज्वारी (१:१)

तर कपाशी + भुईमूग (१:१) या प्रमाणात घ्यावी. भुईमूग + सोयाबीन (४:१) आणि कडेने एरंडीची लागवड (दोन ओळी) केल्यास पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणास मदत होते.

**पेरणीचे अंतर :** दोन ओळीतील अंतर ३० सें.मी. व दोन रोपातील अंतर १० सें.मी. ठेवावे. उन्हाळी हंगामात जमीन ओलावून नंतर वापशावर पाभरीने अथवा टोकण पध्दतीने पेरणी केल्यास बियाणे कमी लागुन उगवण चांगली होते.

**काढणी :** पीक तयार झाले म्हणजे पाने पिवळी पडू लागतात. शेंगाचे टरफल टणक बनते व शेंगाच्या टरफलाची आतील बाजू काळी दिसू लागते.

**उत्पादन :** खरीपात सरासरी १८ ते २० क्विंटल प्रति हेक्टर तर उन्हाळी भुईमूगाचे २५ ते ३० क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन मिळू शकते.

## एरंडी –

**जमीन :** पाणथळ किंवा विम्लयुक्त जमीन सोडून सर्व प्रकारच्या जमिनीत हे पीक घेता येते.

**वाण :** (सरासरी उत्पादन १५-२० क्विंटल प्रति हेक्टर) ज्वाला ४८-१, ज्योती, जीसीएस-४ (संकरित) डी.सी.एच.- ५१९, डी.सी.एच.-६

**बियाणे :** १० ते १५ किलो बियाणे प्रति हेक्टरी वापरावे.

**बीजप्रक्रिया :** मर रोगाच्या प्रतिबंधासाठी ३ ग्रॅम 'थायरम' किंवा 'कॅप्टन' बुरशीनाशक चोळावे.

**पेरणीची वेळ :** जून ते १५ जुलै पर्यत पावसाच्या बेतावर लागवड करावी.

**पेरणीचे अंतर :** मध्यम ते खोल जमीन - ६० X ३० सें.मी., भारी जमीनत ९० X ६० सें.मी. अंतरावर टोकन पध्दतीने पेरणी करावी.

**उत्पादन :** सरासरी १० ते १५ क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन मिळू शकते.

## संयुक्त खताद्वारे खत व्यवस्थापन (प्रति एकरसाठी)

### सोयाबीन

**लागवडीपूर्वी–** शेणखत ६ मे.टन + सुफला १५:१५:१५ खत -१३३ किलो + सिंगल सुपर फॉस्फेट ६३ किलो + बेंटोनाईट सल्फर-९० खत २० किलो + झिंक सल्फेट ८ किलो + बोरॅक्स ४ किलो

### सूर्यफूल

**लागवडीपूर्वी–** शेणखत ४ मे. टन + सुफला १५:१५:१५ खत ८० किलो + बेंटोनाईट सल्फर-९० खत २० किलो.

**लागवडी नंतर ३० दिवसांनी–** उज्वला यूरिया २६ किलो.

### एरंडी

**लागवडीपूर्वी–** शेणखत २ मे. टन + सुफला १५:१५:१५ खत ६७ किलो + बेंटोनाईट सल्फर-९० खत १० किलो.

**लागवडी नंतर ३० दिवसांनी–** उज्वला यूरिया २२ किलो.

### भुईमूग

**लागवडीपूर्वी–** शेणखत ६ मे.टन + सुफला १५:१५:१५ खत -६७ किलो + सिंगल सुपर फॉस्फेट ६३ किलो + बेंटोनाईट सल्फर-९० खत २० किलो + बोरॅक्स ४ किलो

**आऱ्या निघण्याच्या वेळेस–** जिप्सम २०० किलो

### तीळ

**लागवडीपूर्वी–** शेणखत २ मे. टन + सुफला १५:१५:१५ खत ६७ किलो + बेंटोनाईट सल्फर-९० खत १० किलो.

**लागवडी नंतर ३० दिवसांनी–** उज्वला यूरिया २२ किलो.

### मोहरी

**लागवडीपूर्वी–** शेणखत ३ मे. टन + सुफला १५:१५:१५ खत १२० किलो + बेंटोंनाईट सल्फर–९० खत १५ ते २० किलो.

**लागवडी नंतर ३० दिवसांनी–** उज्वला यूरिया ४० किलो.

## एकात्मिक कीड नियंत्रण

एकात्मिक कीड नियंत्रण व्यवस्थेमध्ये बुरशीजन्य किटकनाशकांचे खूप महत्व प्राप्त होत आहे. बाजारात आता अनेक प्रकारची बुरशीजन्य जैविक किटकनाशके मिळू लागली आहेत.

१) **बिव्हेरिया (बिव्हेरिया बॅसियाना)–** या बुरशीपासून बनविलेली बुरशीनाशके मावा, बोंडअळी, पाने गुंडाळणारी अळी, ज्वारीवरील खोडकीड यांचे प्रभावीपणे नियंत्रण करतात.

२) **मेटा–हायझीम (मेटा–हायझीम ॲनिसोप्ली)–** ही बुरशी हिरवट रंगाची असते. मावा, भातावरील तुडतुडे, पांढरी माशी, हुमणी, बोंडअळी, फूलकीडे यांचे नियंत्रण याबुरशीपासून तयार केलेली बुरशीनाशके करतात.

३) **व्हर्टीसिलिअम (व्हर्टीसिलिअम लेकॅनी)–** ही बुरशी रसशोषक किडी उदा. मावा, फूलकीडे, तुडतुडे, पांढरी माशी यांच्या नियंत्रणासाठी उपयुक्त असते.

४) **नोम्युरिया –** या बुरशीचा उपयोग मुख्यत्वे पतंगवर्गीय किडी, कापसातील बोंड अळी, उंटअळी, तंबाखूवरील केसाळ अळी यांच्या नियंत्रणासाठी केला जातो.

५) **ट्रायकोडर्मा (ट्रायकोडर्मा व्हिरीडी)–** 'मुळकुज' सारख्या बुरशीजन्य रोगांच्या नियंत्रणासाठी या बुरशीपासून तयार केलेली बुरशीनाशके वापरली जातात.

## आरसीएफचे स्वनिर्मित दर्जेदार संयुक्त खत

### सुफला १०:२६:२६




आपण आपल्या शेती व्यवसायात आरसीएफचे संयुक्त खत 'सुफला १०:२६:२६' चा वापर केला आहे का? असल्यास याबाबतचा आपला अभिप्राय–

........................................................
........................................................
........................................................
........................................................
........................................................
........................................................
........................................................
........................................................

### मास पंचांग
जुलै २०२२
आषाढ/श्रावण शके १९४४

| | | |
|---|---|---|
| शुक्रवार | १.०७.२०२२ | महाराष्ट्र कृषी दिन |
| रविवार | १०.०७.२०२२ | बकरी ईद |
| बुधवार | १३.०७.२०२२ | गुरूपौर्णिमा |
| शुक्रवार | २९.०७.२०२२ | श्रावण मासारंभ |



## शेतीपत्रिका सभासद अर्ज

शेतकऱ्याचे पूर्ण नाव – ..................................
..................................................
मुक्काम – ..........................................
पोस्ट – ................ तालुका – ...................
जिल्हा – ...........................................
पोस्ट पीन कोड – ☐☐☐☐☐☐
मोबाइल क्रमांक – ..................................
इ–मेल आयडी – ....................................
e-mail ID (असल्यास)
जन्म तारीख – ......................................
वय – .................. शिक्षण – ....................
शेती पत्रिका सभासद असल्यास क्रमांक –
MH-M ☐ - ☐☐☐☐☐☐

नवीन सभासद होण्यासाठी इथे खूण ☑ करा – ☐

आरसीएफ शेती पत्रिकेबाबतचा आपला अभिप्राय –
..................................................
..................................................
..................................................
..................................................
..................................................

–: सदर अभिप्राय पाठविण्यासाठीचा आमचा पत्ता :–
उप महाव्यवस्थापक (सीआरएम विभाग)
राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड
प्रियदर्शिनी, ८ वा मजला, पूर्व द्रुतगती महामार्ग
सायन, मुंबई–४०००२२

e-mail : crmrcf@gmail.com
दूरध्वनी क्र. ०२२–२५५२३०२२

कृपया सदर अभिप्राय पोस्टाने पाठवा किंवा पाकिटामध्ये घालून आपल्या नजीकच्या आरसीएफ कार्यालयामध्ये द्या. सदर मजकूर पोस्ट कार्डावर लिहून अथवा स्कॅन करून इ–मेलद्वारेही पाठवू शकता.
(शेतीपत्रिका नवीन सदस्यत्वासाठी
आणि सभासद नुतनीकरणासाठी हे आवश्यक आहे.)
शेतकऱ्यांसाठी हे मासिक निशु:ल्क आहे.

## नव कृषी संशोधन– पिकांचे नवीन वाण

**१) सोयाबीन– एमएयूएस–७२५**

हा सोयाबीन वाण स्थानीय वाणांपेक्षा उत्पादनात सरस आहे.

**२) ज्वारी– परभणी वसंत**

हा रब्बी ज्वारीचा (हुरड्या साठीचा) नवीन संशोधित वाण असून खोडकीड्याला प्रतिकारक आहे. दाणे मऊ आणि गोड असून कणसातून सहज वेगळे करता येतात.

**३) करडई– परभणी सुवर्णा**

हा वाण अधिक उत्पादन देणारा असून मर रोग, पानांवरील ठीपके या रोगांना सहनशील आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठद्वारा संशोधित या वाणांची मराठवाडा विभागासाठी शिफारस करण्यात आलेली आहे.



## हसा चकटफू !

एकदा कायदा महाविद्यालयामध्ये (एल एल.बी.) क्लास सुरू असतो...

**प्राध्यापक–** जर तू एखाद्याला आंबा देणार असशील तर काय सांगणार ?

**विद्यार्थी–** हा घे आंबा...

**प्राध्यापक–** असं नाही..कायद्याच्या म्हणजे वकीली भाषेत सांग...

**विद्यार्थी–** मी स्वत: पूर्ण शुद्धीत आणि कोणत्याही दबावाशिवाय हे फळ, ज्याला 'आंबा' असे म्हटले जाते, ज्यावर माझा पूर्ण अधिकार आहे. त्याच्या साल, रस आणि बीजासहित आपणास देत आहे.!!!

शेती पत्रिकेत प्रसिद्ध होत असलेल्या लेखांत जी मते व्यक्त केली आहेत ती संबंधित लेखक–लेखिकांची आहेत. त्या मतांशी व्यवस्थापन सहमत असेलच असे नाही.
– संपादक, आरसीएफ शेती पत्रिका.

# जपणूक आमची, सामाजिक बांधिलकीची....

## आरसीएफ लि. च्या नवीन भूमी परीक्षण प्रयोगशाळा आणि किसान सुविधा केंद्राचे उद्घाटन, आळंद, जिल्हा–कलबुर्गी (कर्नाटक राज्य)

राष्ट्रीय केमिकल्स अ‍ॅण्ड फर्टिलायझर्स लि. कंपनी तर्फे कृषी उत्पादन निर्मिती आणि विपणन कार्य करत असताना अनेक सामाजिक आणि कृषी विकास कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतजमिनीचे परीक्षण करून जमीन आरोग्य पत्रिकेनुसार संतुलित खत वापराद्वारे (Balance use of fertilizers) कृषी उत्पादन वाढवता यावे या उद्देशाने आरसीएफच्या वतीने आळंद, जिल्हा – कलबुर्गी (कर्नाटक राज्य) येथे किसान सुविधा केंद्र आणि अत्याधुनिक भूमी परीक्षण प्रयोगशाळा स्थापित करण्यात आली आहे. याचे उद्घाटन मा.श्री. भगवंत खुबा, केंद्रीय राज्यमंत्री (खत आणि रसायन विभाग) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी श्री. सुभाष गुट्टेवार आमदार आळंद मतदार विभाग, श्री. के. यू. थंकाचन, संचालक (विपणन), श्रीमती सुनेत्रा कांबळे कार्यकारी संचालक (विपणन) आरसीएफ लि. मुंबई, श्री. रितेंद्रनाथ सुगुर (JDA-कृषी विभाग), श्री. महालिंगप्पा धानोजी अधिष्ठाता, कृषी महाविद्यालय कलबुर्गी, तसेच आरसीएफचे राज्य आणि जिल्हास्तरीय पदाधिकारी आदी मान्यवर आणि शेतकरी बहूसंख्येने उपस्थित होते.















RNI NO. MAHMAR/2009/32806
Date of Publication 1st of every month. Postal Regd. No. MNE/164/2022-24
Posted at Mumbai Patrika Channel on 10th & 11th of every month




हे मासिक मुद्रक व प्रकाशक श्री. नुह हसन कुरणे यांनी मालक राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लि. मुंबई यांच्यासाठी मे. प्रिंट प्लस प्रा.लि., २१२, स्वस्तिक चेंबर्स, एस.टी. रोड, चेंबूर, मुंबई ४०००७१. येथे छापून राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लि. प्रियदर्शिनी, आठवा मजला, इस्टर्न एक्स्प्रेस हाईवे, सायन, मुंबई – ४०० ०२२ येथे प्रकाशित केले.
संपादक : श्री. नुह हसन कुरणे
RNI NO. MAHMAR/2009/32806
यह मासिक मुद्रक एवं प्रकाशक मा. श्री. नुह हसन कुरणे इन्होने मुंबई, इनके लिए मे. प्रिंट प्लस प्रा.लि., 212, स्वस्तिक चेंबर्स, एस.टी. रोड, चेंबूर, मुंबई 400071. यहाँ मुद्रित करके राष्ट्रीय केमिकल्स एण्ड फर्टिलाइजर्स लि. प्रियदर्शिनी, आठवी मंजिल, इस्टर्न एक्सप्रेस हाईवे, सायन, मुंबई – 400 022 यहाँ से प्रकाशित किया।
संपादक : श्री. नुह हसन कुरणे
RNI NO. MAHMAR/2009/32806



CRM, RCF